
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

यवतमाळ ■ वर्ष १ ■ अंक २३ ■ बुधवार, दि. १७ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MAMAR/ 26 /A4531 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# ऑपरेशन टायगर झाले पुर्ण

## ठाकरेंच्या 6 फुटीर खासदारांचा गट स्थापन ▶▶ आता शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होणार !








वृत्तसंस्था १७ जून

**नवीदिल्ली :** उद्धव ठाकरे यांची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी अखेर दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांना भेटून आपण स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे पत्र दिले. लोकसभा अध्यक्षांनी या स्वतंत्र गटाला मंजूरी दिली असून बंडखोर खासदारांच्या स्वतंत्र गटाच्या स्थापनेची प्रक्रिया दिल्लीत पूर्ण झाली आहे. त्यानंतर हा गट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. काल रात्रीपासून ठाकरे गटाचे फुटीर खासदार एक-एक करुन दिल्लीत दाखल व्हायला सुरुवात झाली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील काल रात्री दिल्लीत दाखल झाले होते. यानंतर ठाकरे गटाच्या बंडखोर खासदारांना अज्ञातस्थळी ठेवण्यात आले होते. काहीवेळापूर्वीच या सहा बंडखोर खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्यासोबत लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांची भेट घेऊन आपला स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे पत्र सादर केले. लोकसभा अध्यक्षांच्यादेखत बंडखोर आमदारांनी पत्रावर सह्या केल्या. त्यामुळे या खासदारांच्या स्वतंत्र गटाला लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिली.

पक्षांतरबंदी कायद्यानुसार, स्वतंत्र गट स्थापन करण्यासाठी आमदार किंवा खासदार संख्येच्या एकूण संख्याबळाच्या दोन तृतीयांश संख्याबळाची गरज असते. ठाकरे गटाचे एकूण नऊ खासदार आहेत. यापैकी सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला आहे. त्यामुळे या गटाला अधिकृत मंजुरी मिळाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात ऑपरेशन टायगरची चर्चा सुरु होती. मात्र, दिल्लीतील भाजपश्रेष्ठींना या ऑपरेशनला ग्रीन सिग्नल दिला नव्हता. अखेर १० जून रोजी दिल्लीत झालेल्या एनडीएच्या बैठकीनंतर अमित शाह यांनी पंतप्रधान मोदींशी बातचीत करुन या ऑपरेशनला ग्रीन सिग्नल दिला. यानंतर दिल्लीतील एका हॉटेलमध्ये ठाकरे गटाचे बंडखोर खासदार एकनाथ शिंदे यांना भेटले होते, त्यानंतर

### ५० कोटीत एक खासदार - संजय राऊत

पत्रकार परिषदेत बोलताना खासदार संजय राऊत यांनी काल रात्रीच्या घडामोडींचा खुलासा केला. काल रात्री ११ वाजेच्या सुमारास मला एका विश्वासू सूत्राने माहिती दिली की, महाराष्ट्रातील खासदारांना विकत घेण्याची मोठी डील झाली आहे. प्रत्येकी ५० कोटी रुपयांना खासदारांना विकत घेतले जात असून, काल रात्रीच १५ कोटींचा ॲडव्हान्स दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली. मी ती लगेच सोशल मीडियावर जाहीर केली,' असे राऊत म्हणाले.

### ओमराजे निंबाळकरांवर खटल्याच्या निकालासाठी दबाव

२० वर्षांपूर्वी ओमराजे निंबाळकर वडीलांची हत्या झाली. गेली २० वर्षे तो खटला सुरू आहे, काल त्यांचा निकाल होता, मुंबई हायकोर्टात पण ओमराजे निंबाळकरांवर दबाव टाकण्यात आला की तुमच्या बाजूने निकाल हवा असेल तर आमच्या गटात सामील व्हा. संजय राऊत म्हणाले की, खून प्रकरणचा निकाल तुमच्या बाजूने हवा असेल तर तुम्ही या लेटरवर सही करा आणि आमच्यासोबत या. जर देशाचा कायदा आणि न्यायव्यवस्था या पद्धतीने चालत असेल तर तर काय संविधान आणि काय न्यायव्यवस्था त्यामुळेच या प्रकरणाचा निकाल दोन दिवस पुढे ढकलला गेला.

### ऑपरेशन टायगर नव्हे , ऑपरेशन गिधाड -पटोले

महाराष्ट्रातील 'ऑपरेशन टायगर'वरून काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी भाजप आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन गिधाड आहे, असे म्हणत त्यांनी सत्तेसाठी सुरू असलेल्या राजकीय हालचालींवर निशाणा साधला. लोकशाही व्यवस्थेत जनता पक्षाला मत देते, मात्र सत्ताधारी इतर पक्षांतील निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना आपल्या बाजूने वळवून सत्तेचा माज दाखवत असल्याचा आरोप त्यांनी केला. नाना पटोले म्हणाले, सत्तेची भूक असावी, पण मोदी आणि त्यांच्या आघाडीने ती मर्यादाही ओलांडली आहे. लोकशाही व्यवस्थेची हत्या करण्याचे काम सुरू आहे. तसेच लोकसभा अध्यक्षांच्या स्वायत्ततेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत, स्पीकरही मोदी-शहा सांगतील तेच करतात, असा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर पटोलेंचे हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे.

# पातूर रोडवरील रिलायन्सच्या प्लांटला भीषण आग !

## आग विझविण्याचे प्रयत्न सुरूच, आकाशात धुराचे लोटच लोट, परिसरातील नागरिकांमध्ये भीती

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** पातूर रोडवरील (हरिसाल-नांदेड राष्ट्रीय महामार्ग) चांदूर-बारलिंगा परिसरात असलेल्या रिलायन्स कंपनीच्या बॉटलिंग प्लांट परिसरात मंगळवारी रात्र उशिरा भीषण आग लागली. अचानक आगीचे लोळ वातावरणात दिसत असल्याने परिसरातील नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सर्वत्र धुराचे लोट दिसत असल्याने आगीची भीषणता लक्षात येत होती. ही आग विझविण्यासाठी महानगरपालिका अकोल्याचे दोन अग्नीशमन दलाच्या गाड्या व एक एमआयडीसीची गाडी प्रयत्न करीत होती. मात्र दुसरा दिवस उजाडला तरी आग धुमसतच होती.

मंगळवारी रात्री उशिरा लागलेल्या या आगीने एकच खळबळ उडाली. अचानक उसळलेल्या आगीच्या प्रचंड ज्वाळा आणि आकाशाला भिडणारे धुराचे लोट पाहून परिसरातील नागरिक घटनास्थळाकडे धाव घेत होते. घटनेची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत युद्धपातळीवर बचाव व नियंत्रण कार्य सुरू केले.

कंपनीमधून अचानक धूर निघू लागल्यानंतर काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. आगीच्या ज्वाळा मोठ्या प्रमाणात उसळल्याने परिसरातील कामगार आणि नागरिकांमध्ये घबराट पसरली. घटनेची माहिती मिळताच अकोला मनपा अग्निशमन दलाच्या दोन गाड्यांसह जवान घटनास्थळी दाखल झाले तसेच एमआयडीसी भागातूनही एक गाडी घटनास्थळी दाखल झाली होती.



### ...तर मोठा अनर्थ घडला असता!

या प्लांटमधून औद्योगिक गॅसचा पुरवठा होत असल्याची माहिती समोर येत असून ही आग इतरत्र पसरली असती तर फार मोठा अनर्थ घडला असता, अशी चर्चा घटनास्थळी सुरू होती. या भीषण आगीमध्ये नेमके किती नुकसान झाले, याची माहिती आग पूर्णपणे आटोक्यात आल्यानंतर समजणार असून तसेच घटनेमागील कारणांची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

# ऑपरेशन टायगरशी भाजपचा संबंध नाही-बावनकुळे

प्रतिनिधी १७ जून

**मुंबई:** राज्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांवर भाजप प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत भाजपचा या घडामोडींशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राला मजबूत सरकार मिळाले असून देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे मुख्यमंत्री आहेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच संजय राऊत यांनी खासदारांना १५ कोटींचा ॲडव्हान्स दिल्याचा केलेला दावा अत्यंत चुकीचा आणि बिनबुडाचा असल्याचे त्यांनी म्हटले. बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीवर थेट निशाणा साधताना म्हटले की, 'उद्धव ठाकरेंनी आधी स्वतःचा पक्ष सांभाळावा. त्यांचे आमदार आणि खासदार त्यांना सोडून का चालले आहेत? आपले लोक कुठे जात आहेत आणि का जात आहेत, याचे त्यांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. आपल्याच लोकांना सांभाळता येत नसल्याने विरोधक भाजपवर नाहक आरोप करत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

# पातूर नगर परिषद निवडणूक रणधुमाळी आरआरसी नेटवर्कने जाणला जनतेचा कौल

प्रतिनिधी १७ जून



**पातूर:** पातूर स्वराज्य संस्थेच्या सत्तेची चावी कुणाकडे राहील. नगर परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत मतदारांच्या मनात काय चाललंय? यावर 'आरआरसी न्यूज'ने थेट जनतेच्या दरबारात जाऊन घेतलेला विशेष कौल आज औत्सुक्य निर्माण करणारा ठरला. या निवडणुकीत कोणते फॅक्टर महत्त्वाचे ठरणार यावर वक्त्यांनी आपली मते निर्भीडपणे मांडली.

नगराध्यक्षपदाचे उमेदवार सचिन ढोणे, नगरसेवक पदाचे उमेदवार अजय गजानन पाटील, राजू उगले ,पूनम बायस, निशा निखाडे, कैलास उगले, आनंद तायडे, व परसरामजी उंबरकर, डॉ. प्रशांत लोथे, संगीता इंगळे, संजय निखाडे, संजय बगाडे, नवीन ढोकणे, तुकाराम श्रीनाथ, भगवान श्रीनाथ, वासुदेव सौंदळे यांनी आरआरसीच्या रणधुमाळीमध्ये सहभाग घेतला. अतिशय वादळी चर्चा झाली. तसेच आर आर सी नेटवर्कने निवडणुकीच्या वातावरणात रंग भरल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# आईवर तलवारीने वार; नंतर मुलाची निर्घृण हत्या



## तिघे पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी १७ जून

**रिसोड :** शहरातील हिंगोली मार्गावरील माणुसकी नगर भागात १५ जून रोजी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास एक रक्ताळलेला थरार घडला. जुन्या वादाचा राग मनात धरून, रस्त्यावरील नालीच्या ढाप्यावर गाढ झोपेत असलेल्या ३८ वर्षीय युवकाचा डोक्यावर दगड आणि लोखंडी रॉडने जबर वार करून निर्घृण खून करण्यात आला. भगवान सुभाष गायकवाड असे मृतकाचे नाव आहे. या घटनेच्या काही तास आधीच आरोपींनी मृतकाच्या आईवर तलवारीने वार करून त्यांना गंभीर जखमी केले होते. एकाच रात्री घडलेल्या या प्राणघातक हल्ल्यामुळे आणि हत्येमुळे संपूर्ण रिसोड शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणी रिसोड पोलिसांनी आठ जणांविरोधात हत्येसह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून तिघांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी आरोपींवर कलम १०३ (१), १८९ (२), १९०, १९१ (२), १९१ (३), ११८, ११५ (२) आणि ३५२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील तीन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातर्फे मोफत गुडघा व खुब्याच्या सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शिबीर

प्रतिनिधी १७ जून

**यवतमाळ :** जिल्हा महिला व बाल रुग्णालय यवतमाळ येथे शिबिराचे आयोजन मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, ममता अँड मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन, मुंबई तसेच संजीवनी ममता हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ येथे मोफत गुडघा व खुब्याच्या सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १७ जून रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत जिल्हा महिला व बाल रुग्णालय, यवतमाळ येथे होणार आहे. यवतमाळ व परिसरातील गुडघेदुखी, सांधेदुखी, चालताना त्रास, जिने चढताना अडचण तसेच गुडघ्यात सूज अशा समस्यांनी त्रस्त नागरिकांसाठी हे शिबिर लाभदायी ठरणार आहे. शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांची निवड करण्यात येणार आहे. वार्षिक उत्पन्न एक लाख ६० हजार रुपयांपर्यंत असलेल्या व आवश्यक उत्पन्नाचा दाखला सादर करणाऱ्या पात्र रुग्णांची गुडघा व खुब्याच्या सांधा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून पूर्णतः मोफत करण्यात येणार आहे. निवड झालेल्या रुग्णांवर मुंबई येथील संजीवनी ममता हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येईल. शिबिरामध्ये तज्ज्ञ ऑर्थोपेडिक डॉक्टरांचे मार्गदर्शन व तपासणी, मोफत एक्स-रे सुविधा, आवश्यक वैद्यकीय सल्ला तसेच औषधांचे विनामूल्य वितरण करण्यात येणार आहे. शिबिरासाठी येताना संबंधित वैद्यकीय कागदपत्रे, जुने एक्स-रे आणि उत्पन्नाचा दाखला सोबत आणावा, असे आवाहन करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी डॉ. प्रसाद वनसोड (९४२ २१६९२८४), अनिल पिसे (९१६८५ ८५५८६), विनोद मोरे (७६६६ ९७९३८१), सुमित पारधे (८३९०० २३३९३) व आवेश खान (२५०३६, ३१३२०) यांच्याशी संपर्क साधावा. या शिबिराचे आयोजन मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदन कक्ष तसेच ममता अँड मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# यशस्विनी लोकसंचालित साधन केंद्राची 16 वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

प्रतिनिधी १७ जून

**यवतमाळ**- महिलांना २२ कोटींहून अधिक कर्जवाटप; अडीच कोटींचे धनादेश वितरण व उद्योजिकांचा गौरव महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत कार्यरत यशस्विनी लोकसंचालित साधन केंद्राची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गंगा-काशी सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. कार्यक्रमाचे उद्‌घाटन शितलताई संजय राठोड यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी मान्यवरांचा वृक्ष, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेच्या सन २०२५-२६ च्या वार्षिक



अहवालाचे अनावरण करण्यात आले. यावेळी बोलताना शितलताई राठोड यांनी महिला बचत गट हे केवळ आर्थिक माध्यम नसून महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाचे प्रभावी व्यासपीठ असल्याचे सांगितले. बचत गटांमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला असून स्वावलंबनाची भावना बळकट झाली आहे. कुटुंबाच्या विकासात महिलांचे योगदान अधिक प्रभावी झाले असून आज महिला विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. बचत गटांच्या माध्यमातून अनेक महिलांनी उद्योग-व्यवसाय उभारून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली असल्याचे त्यांनी नमूद केले. ही चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सर्व महिलांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला सखी वन स्टॉप सेंटरचे व्यवस्थापक मिलन जगताप, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सुशील गरुड, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सुनील सोसे, जिल्हा समन्वयक, स्संगीता गायकवाड, व्यवस्थापक सुनंदा मानकर तसेच स्वयंसहाय्यता बचत गटांच्या महिला उपस्थित होत्या.


# आदिवासी मुलांच्या शासकीय वसतीगृहाची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी १७ जून

**यवतमाळ :** आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, सावळी सदोबा ता. आर्णी, जि. यवतमाळ येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. वसतीगृहाची एकूण क्षमता ७५ विद्यार्थ्यांची असून पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेशासाठी विद्यार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. वसतीगृहात मोफत निवास, भोजन, निर्वाह भत्ता तसेच इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. शासनाच्या निकषांनुसार डीबीटी प्रणालीद्वारे आर्थिक लाभ थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जातील.पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन गृहपाल, आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, सावळी सदोबा यांनी केले आहे.

CMYK CMYK

# कमलाबाई सोहोनी भारतातील पहिल्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.)!



कमला सोहोनी यांचा जन्म १८ जून १९११ रोजी इंदोर येथे झाला होता. त्यांचे वडील नारायण भागवत आणि काका माधवराव भागवत हे इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्स मधून रसायनशास्त्र विषयावरची पदवी घेणाऱ्या पहिल्या विद्यार्थ्यांपैकी एक होते.कमला सोहोनी' यांनी बालपणीच या दोघांकडून विज्ञानाचे धडे गिरवले होते. ज्येष्ठ साहित्यिका दुर्गा भागवत आणि कमला दोघी बहिणी होत्या. मुंबई विद्यापीठातून एम.एस्सी. त्या काळात पदवी मिळवणा-या कमला एकमेव आणि पहिल्या महिला होत्या. तंत्रज्ञान संशोधन शिष्यवृत्ती आणि स्पिंगर रिसर्च शिष्यवृत्ती मिळवल्यानंतर त्यांनी 'इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बेंगलोर' या संस्थेत प्रवेश मिळवला. या संस्थेत प्रवेश मिळवण्यासाठी देखील त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. तेथे डॉ. सी. व्ही. रामन यांच्या मार्गदर्शनाखाली, तर पुढे केंब्रिजमध्ये प्रा. एफ. हाफकिन्स यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले संशोधनकार्य केले. मुंबई, दिल्ली आणि बडोदा येथील महाविद्यालयांतून जीवरसायशास्त्र विभाग सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता. म्हशीचे दूध मातेच्या दुधासमान करण्याची प्रक्रिया शोधणे, दुधातील व कडधान्यांतील प्रथिने शोधणे, निरा पेयाचे परिणाम व उपयोग आणि ताडगुळाविषयीचे त्यांचे संशोधन केले.

ब्रिटिश अंकित राष्ट्रातली एक हिंदुस्थानी मुलगी म्हणून त्यांना आपल्या शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. इसवी सन १९३३ मध्ये रसायनशास्त्र हा विषय घेऊन त्या पहिल्या वर्गात बी.एस्सी.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यांनी वर्तमानपत्रातीत जाहिरातीनुसार शास्त्रीय संशोधनासाठी बंगलोर येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ़ सायन्स'मध्ये अर्ज केला. टाटांनी १९११ मध्ये स्थापन केलेल्या या संस्थेत प्रवेश मिळणे अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जाई. प्रवेशासाठी कमलाबाई पूर्णपणे पात्र होत्या, परंतु संस्थेचे प्रमुख, नोबेल पारितोषिक विजेते सर सी.व्ही. रामन यांनी 'मुलगी असल्याने प्रवेश देता येत नाही' असे कमलाबाईंना कळविले. कमलाबाई रामन यांना प्रत्यक्ष भेटल्या व 'मुलगी म्हणून माझ्यावर होणारा अन्याय मी कदापि सहन करणार नाही,आणि इथे राहून मी संशोधन करून एम.एस्सी. होणारच.' असे ठामपणे सांगितले. रामन यांनी कमलाबाईंच्या हट्टास्तव त्यांना एका वर्षासाठी प्रवेश दिला. मग वर्षभर कमलाबाईंनी बायोकेमिस्ट्री या विषयाचा झपाटून अभ्यास केला. वर्षअखेर रामन त्यांना म्हणाले. तुमची निष्ठा आणि चिकाटी पाहून असे वाटते की, यापुढे संस्थेत फक्त मुलींनाच प्रवेश द्यावा.'

### सन्मान

लीग ऑफ नेशन्समध्ये भारत, इंग्लंड व अमेरिका या तिन्ही देशांच्या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व, (लक्झेंबर्ग), १९३८, राष्ट्रपती पदक प्राप्त., भारतीय विज्ञान संस्था, बेंगलोर, भारत : दुधातील व कडधान्यांतील प्रथिनांचे पृथक्करण. ह्युमनायझेशन ऑफ बफेलो मिल्क. सर विल्यम डन इन्स्टिट्यूट ओफ़ बायोकेमिस्ट्री, केंब्रिज, इंग्लंड : वनस्पतीमध्ये 'सायटोक्रोम'चा शोध. या शोधाबद्दल केंब्रिज विद्यापीठाने पीएच.डी. पदवी दिली. आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ जगतात नाव झाले. न्यूट्रिशन रिसर्च लॅब, कुन्नूर, भारत : तोसला यीस्ट जीवनसत्त्व 'प'चा शोध. भारतीय विज्ञान संस्था, मुंबई, भारतः कडधान्यांमधील ट्रिप्सीन इनहिबिटस. आरे दूध कॉलनीतील दूध, गुरांचे गवत. वासरांचा आहार, धान आट्यातील पौष्टिक घटक, नीरा या पेयातील उपयुक्त घटक, त्यांचे माणसांवर परिणाम. नीरा संशोधनाबद्दल त्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट संशोधनाबद्दलचे राष्ट्रपती पारितोषिक मिळाले.

### मार्गदर्शक म्हणून काम

या सर्व संशोधनांत सहभागी होणाऱ्या त्यांच्या २५ विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाकडून एम.एस्सी. व १७ विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी मिळाली. १९६९ मध्ये निवृत्त झाल्यावर स्वयंपाकघरात तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांवर संशोधन करून डॉ. कमलाबाई सोहोनींनी अनेक लेख लिहिले. त्यांचे एक पुस्तक आहार-गाथा या नावाने प्रसिद्ध झाले आहे.

### शिक्षण

एम.एस्सी.(मुंबई भारत)१९३७, पीएच.डी. (केंब्रिज इंग्लंड) १९३९,सत्यवती लल्लूभाई सामळदास शिष्यवृत्ती, १९३१, टेक्निकल रिसर्च स्कॉलरशिप, बॉंबे प्रेसिडेन्सी, १९३३, स्पिंगर रिसर्च स्कॉलरशिप, १९३७, सर मंगळदास नथूभाई फ़ॉरिन एज्युकेशन स्कॉलरशिप, १९३७, इन्टरनॅशनल फ़ेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी विमेन (अमेरिकेची संयुक्त संस्थाने)ची ट्राव्हेलिंग स्कॉलरशिप, १९३८.

पुढे १९३७ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या 'स्प्रिंगर रिसर्च' आणि 'सर मंगलदास नथूभाई' या शिष्यवृत्त्या मिळवून कमला सोहोनी इंग्लंडला गेल्या. तिथे केंब्रिजमधील जगप्रसिद्ध सर विल्यम डन लॅबॉरेटरीचे डायरेक्टर, नोबेल पारितोषिकविजेते सर फ्रेड्रिक गॉलन्ड हॉपकिन्स यांना भेटून, संस्थेत प्रवेश देण्याची विनंती केली. त्यावर त्यांनी 'माझ्या प्रयोगशाळेतील सर्व जागा भरल्या आहेत, तुलाच जागा मोकळी दिसली तर सांग' असे सांगितले. कुणाचीच ओळख नसल्याने बाई हताश झाल्या, तेव्हाच तेथील एक शास्त्रज्ञ डॉक्टर रिक्टर यांनी त्यांना आपली जागा देऊ केली. दिवसा त्या जागेवर, सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत बाई काम करीत, आणि रात्री डॉ. रिक्टर. पहिले सत्र संपायला केवळ दोन-तीन दिवस बाकी असताना कमलाबाईंनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेतला आणि 'प्राणिमात्रांप्रमाणे सर्व वनस्पतीतीलही साऱ्या जीवनक्रिया 'सायटोक्रोन-सी'च्या मध्यस्थीने एन्झाइम्समुळे होतात, हे मूलभूत महत्त्वाचे संशोधन सादर करून १९३९ साली केंब्रिज विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही पदवी संपादन केली. इतरांचे प्रबंध हजार-पंधराशे पानांचे असताना, कमलाबाईंचा प्रबंध अवघ्या ४० पानांचा होता आणि तो त्यांनी त्यावेळी एका व्याख्यानाद्वारे सभागृहापुढे ठेवला.

त्यानंतर अनेक शास्त्रज्ञाच्या आग्रहाला बळी पडून पुढील संशोधनासाठी इंग्लंडमध्ये न राहता, डॉ. कमलाबाई मायभूमीच्या प्रेमाने भारतात परत आल्या. दिल्लीच्या 'लेडी हार्डिंग्ज कॉलेज' व पुढे मुंबईच्या (रॉयल) इन्स्टिट्यूट ऑफ़ सायन्स' या संस्थेत त्यांनी काम केले. मुंबईच्या याच संस्थेच्या निदेशक म्हणून त्या निवृत्त झाल्या. 'लेडी हार्डिंग्ज कॉलेजमधली जीवरसायनशास्त्राच्या प्राध्यापकाची त्यांची नोकरी, डॉ. हॉपकिन्स यांच्या सूचनेनुसार १९३८ सालापासून कमलाबाईंकरिता राखून ठेवण्यात आली होती. इंग्लंडहून आल्यावर १९३९ मध्ये, सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात त्या आपल्या नोकरीवर रूजू झाल्या.

## दिन विशेष

### भारताच्या स्वातंत्र्यानंतरही गोवा 14 वर्ष होते पोर्तुगीजांच्या ताब्यात!




१८ जून हा दरवर्षी गोवा क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. इ.स. १९४६ मध्ये या दिवशी डॉ. राम मनोहर लोहिया यांनी गोव्यातील लोकांना पोर्तुगीजांच्या विरोधात बोलण्याची प्रेरणा दिली. १८ जून हा दिवस गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. १८ जून १९४६ रोजी डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोव्यातील जनतेला पोर्तुगीज राजवटीविरुद्ध संघटित होऊन लढा देण्याचा संदेश दिला. यादिवशी झालेल्या क्रांतीच्या जोरदार वक्तृत्वाने स्वातंत्र्यलढ्याला बळ दिले आणि पुढे केले. पोर्तुगीजांच्या विरोधात येथे मोठे जनमत होते. पोर्तुगीजांनी पाच वेळा गोवा इन्क्विझिशन द्वारे प्रचंड अत्याचार येथील हिंदू जनतेवर केले आणि हिंदूंचा छळ केला. अखेरीस, १९ डिसेंबर १९६१ रोजी, भारतीय सैन्याने गोव्यावर आक्रमण केले, हा भाग पोर्तुगीज राजवटीपासून मुक्त केला आणि गोवा भारताला जोडला. त्यामुळे दरवर्षी गोव्यातील लोकं १९ डिसेंबर हा गोवा मुक्ती दिन म्हणून साजरा करतात.

गोवा क्रांती दिन हा गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यातील सर्वात महत्त्वाचा दिवस आहे, जो दरवर्षी १८ जून रोजी साजरा केला जातो.१८ जून १९४६ रोजी डॉ. राम मनोहर लोहिया यांनी मडगाव येथे पोर्तुगीज राजवटीविरुद्ध ऐतिहासिक लढा पुकारत जनतेला संघटित केले होते. २२ मे १४९८ रोजी वास्को-द-गामा भारतात आल्यापासून गोव्यावर पोर्तुगीजांचे राज्य होते.१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला असला, तरी गोव्याला पोर्तुगीजांच्या दास्यातून मुक्त होण्यासाठी आणखी १४ वर्षे संघर्ष करावा लागला. थोर समाजवादी नेते डॉ. राम मनोहर लोहिया आणि त्यांचे सहकारी डॉ. ज्युलियाओ मिनेझिस यांनी गोव्यातील जनमानसात जागृती निर्माण करण्याचे ठरवले.पोर्तुगीज सरकारने गोव्यात सार्वजनिक सभांवर कडक बंदी घातली होती. या बंदीला आव्हान देत, १८ जून १९४६ रोजी डॉ. लोहिया यांनी मडगाव येथील सभेमध्ये हजारो गोमंतकीयांसमोर भाषण केले.त्यांनी पोर्तुगीजांच्या दडपशाहीविरोधात जनतेला 'मोकळेपणाने विचार करा, मोकळेपणाने बोला, मोकळेपणाने लिहा' असा संदेश दिला. महत्त्वच्या घटनेमुळे गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याला एक नवीन दिशा मिळाली आणि देशभरातून गोवा मुक्ती आंदोलनाला बळ मिळाले. याच क्रांतीची परिणती म्हणून अखेर १९ डिसेंबर १९६१ रोजी भारतीय लष्कराने पोर्तुगीजांचा पराभव करून गोव्याला पूर्णपणे स्वतंत्र केले. या दिवसाचे स्मरण म्हणून दरवर्षी १८ जून रोजी गोव्यातील आझाद मैदान (पणजी) आणि लोहिया मैदान (मडगाव) येथे विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात. या दिवशी स्वातंत्र्यसैनिकांना शासकीय पातळीवर आदरांजली वाहिली जाते.हेमंत

# इतिहासातील प्रसिद्ध वॉटर्लूची लढाई!



वॉटर्लूची लढाई ही १८ जून, इ.स. १८१५ रोजी तत्कालीन नेदरलँड्सच्या संघटित राजतंत्रातील वॉटर्लू येथे (वर्तमान बेल्जियम) झालेली लढाई होती. या लढाईत ब्रिटन, हॉलंड, बेल्जियम, प्रशिया यांचा समावेश असलेल्या नेपोलियन विरोधी ७ व्या युतीच्या सैन्याने फ्रेंच सम्राट नेपोलियन यांच्या नेतृत्वाखालील फ्रेंच साम्राज्याच्या सैन्याचा निर्णायक पराभव केला.

१८१५ मध्ये नेपोलियन एल्बा येथुन नजरकैदेतून सुटून पुन्हा पॅरिसला आला व आपले साम्राज्य पुनःप्रस्थापित करण्याच्या उद्योगाला लागला. त्याने आपले मोठे सैन्य पुन्हा एकत्र केले व आपल्या जुन्या शत्रुंविरुद्ध आघाडी उघडली. हॉलंड, प्रशिया, बेल्जियम व युनायटेड किंग्डम यांनी देखिल प्रत्युतर म्हणून नेपोलियन विरुद्ध संयुक्त आघाडी उघडली. या आघाडीचे नेतृत्व जनरल आर्थर वेलस्ली कडे देण्यात आले. व १८ जून १८१५ रोजी वॉटर्लु येथे दोन्ही फौजा एकमेकांना भिडल्या. वेलस्लीने पारंपरिक व्यूहरचना केलेली होती. आसपासच्या प्रदेशाची टेहळणी करून त्याने आपल्या सैन्याचा मुक्काम हा एका टेकडीच्या उतारावर ठोकला. तेथून त्याने आपले सैन्य नेपोलियनच्या सैन्याला आडवे घातले व लढण्यास भाग पाडले. नेपोलियनला या व्यूहातील आपला गैरफायदा माहिती होता परंतु अधिक वेळ काढला असता मागून चालून येणारे प्रशियन सैन्य व ब्रिटिश या दोघांशी लढणे अधिकच कठीण गेले असते. असे असता त्याने वेलस्लीवर चाल केली. सुरुवातीला वेलस्लीने बचावाचे घोरण स्वीकारले व पर्शियन सैन्य येईपर्यंत वेळकाढूपणा अवलंबला. दरम्यान फ्रेंच सैन्याच्या अनेक चाली ब्रिटिश सैन्याने परतवून लावल्या. सरतेशेवटी नेपोलियनने आपले इंपिरियल गार्ड ब्रिटिशांवर घातले परंतु ते देखील फसले. नेपोलियनने आपली सगळी हुकमी पाने वापरलेली पाहून वेलेस्लीने आता आपले सैन्य आक्रमक पवित्र्यात आणले व तो फ्रेंचांवर चाल करून गेला. काही वेळातच फ्रेंच सैन्याला पराभव स्पष्ट होऊ लागला व त्यांनी तेथून काढता पाय घेण्यास सुरू केले.

## लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला

**ई-निविदा सुचना क्र.02 सन 2026-27**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला येथील जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा क्र.०१ बांधकाम करणे मौजे निंबी मालोकार ता. अकोला या कामाचे निविदा प्रक्रिया हि जलसंपदा विभाग शा. नि. दिनांक. १८/१०/२०२३ व दिनांक ०१/०८/२०२५ जलसंधारण विभाग शा.नि. ०३/०१/२०२३ ग्रामविकास विभाग शा.नि. दिनांक २३/०९/२०१३ व दिनांक ०८/१०/२०२१ च्या अनुषंगाने राबविण्यांत येत आहे. ई- निविदा प्रक्रिया मधुन योग्य त्या प्रवर्गा कडून खुल्या ऑनलाईन ई निविदा मागविण्यांत येत आहेत. सदर ई निविदा सुचना क्र.०२ सन २०२६-२०२७ दिनांक. १७ जुन २०२६ रोजी सविस्तरपणे खालील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

Main Portal-https://mahatenders.gov.in

**जिल्हा जलसंधारण अधिकारी,
लघुपाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, अकोला**

**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अकोला**

# व्यायाम करताना व झाल्यावर काय काळजी घ्यावी?

उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी व्यायाम करावा की टाळावा, हा अनेकांना पडणारा प्रश्न आहे. आधुनिक वैद्यकीय शास्त्रानुसार नियमित व्यायाम रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतो. मात्र, अनियंत्रित रक्तदाब असताना किंवा हृदयविकाराचा धोका असल्यास अतितीव्र व्यायाम हृदयावर अतिरिक्त ताण निर्माण करू शकतो. चालणे, मध्यम स्वरूपाचा कार्डिओ आणि नियंत्रित स्ट्रेंथ ट्रेनिंग हे हायपरटेन्शन असलेल्या व्यक्तींसाठी सुरक्षित पर्याय मानले जातात. योग्य वॉर्म-अप, हायड्रेशन, कूल-डाउन आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यायाम केल्यास हृदयाचे आरोग्य दीर्घकाळ चांगले राहण्यास मदत होते.



उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींना पूर्वीच्या काळी नेहमी 'आराम करा' किंवा जड शारीरिक कष्टाची कामे टाळा असा सल्ला दिला जायचा. परंतु, आधुनिक वैद्यकीय विज्ञानानुसार, नियमित व्यायाम हा रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचा आणि हृदयाचे आरोग्य राखण्याचा विना-औषधाचा एक सर्वोत्तम मार्ग आहे. असे असले तरी, आजच्या काळात एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न वारंवार उपस्थित केला जातो: खूप जास्त तीव्रतेचा किंवा हेवी व्यायाम उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांच्या हृदयाला इजा पोहोचवू शकतो का? याचे उत्तर प्रत्येक व्यक्तीचा रक्तदाब किती नियंत्रणात आहे, त्यांच्या हृदयाचे एकंदरीत आरोग्य कसे आहे, त्यांची शारीरिक क्षमता किती आहे आणि ते कोणत्या प्रकारचा व्यायाम करतात यावर अवलंबून असते.

जेव्हा आपण व्यायाम करतो, तेव्हा स्नायूंना ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा करण्यासाठी आपले हृदय अधिक वेगाने आणि ताकदीने काम करू लागते. यामुळे व्यायामादरम्यान तात्पुरत्या स्वरूपात रक्तदाब वाढणे ही एक सामान्य आणि नैसर्गिक प्रक्रिया आहे. निरोगी व्यक्तींसाठी ही बाब फायदेशीर ठरते. परंतु, ज्या व्यक्तींचा रक्तदाब अनियंत्रित आहे किंवा ज्यांना आधीपासूनच हृदयाचे काही छुपे आजार आहेत, त्यांनी अचानक अति-तीव्रतेचा किंवा जड व्यायाम केल्यास त्यांच्या हृदय व रक्तवाहिन्यांवर अवाजवी ताण पडतो. यामुळे हृदयविकाराशी संबंधित गंभीर वैद्यकीय गुंतागुंत निर्माण होण्याचा धोका वाढू शकतो. याचा अर्थ असा नाही की व्यायाम करणे बंद करावे, तर व्यायामाची तीव्रता नियंत्रित असणे गरजेचे आहे. नियमित आणि मध्यम स्वरूपाच्या व्यायामामुळे विश्रांतीच्या वेळचा रक्तदाब कमी होतो, रक्ताभिसरण सुधारते, हृदय मजबूत होते आणि पर्यायाने हार्ट अटॅक किंवा स्ट्रोकचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो.

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला

**ई-निविदा सुचना ०६/ २०२६-२०२७**

जावक क्रमांक ३७२६/ ईनिसु-०६/निलि/ २०२६ / दिनांक १/०६/२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम, कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र.१ ते ३ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार तसेच अंतरराष्ट्रीय कंपनी यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदे स्पर्धे मध्ये भाग घेवू शकेल. निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेत स्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रूपये) |
|---|---|---|
| १ | अकोला जिल्हयातील अकोला तालुक्यातील एनएच ते म्हैसपूर प्रजिमा-२८ कि.मी.०/०० ते ३/५०० पर्यत रस्त्याची रुंदीकरणासह सुधारणा करणे (रा.म.मा.१६१ एक कान्हेरी पासून साहित पर्यंत)' | ३८८४२०७१ |
| २ | अकोला जिल्हयातील अकोला तालुक्यातील म्हैसांग रामगांव दहिगांव गावंडे अन्वी मिर्झापूर बोरगांव मंजू रस्ता प्रजिमा-१२ कि.मी.३/०० ते ४/०० व ४/५०० ते ६/०० मध्ये सुधारणा करणे व संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे ३/८०० (रा.म.२८० म्हैसांगपासून रामगांव आणि रा.म. २८४ कासमपूर पासून रा.म.मा.५३ बोरगांव पर्यंत) | २२७३३७५० |
| ३ | अकोला जिल्हयातील अकोला तालुक्यातील अकोला आपातापा म्हैसांग रस्ता रा.मा. २८०किमी ७/२०० मध्ये पूलाचे बांधकाम करणे (अकोला पासून म्हैसांग पर्यत आणि लाखपुरी पासून बल्लारखेड पर्यत आणि कवठा खोलापूर पासून आसरा पर्यंत आणि भातकुली पासून अमरावती कु-हा पुलागांव पर्यत रामा २८०) | १९५८५२४० |

**अटी व शर्ती :-** १ सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. २- ई-निविदा काम क्र.१ ते ३ कामांची ई-निविदा दिनांक १७.०६.२०२६ रोजी १०.०० पासून दिनांक २४.०६.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सवमीशन करता येतील. ई-निविदा कामांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक २९.०६.२०२६ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे) ३- वरील काम क्रं.१ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक १८/०६/२०२६ वेळ १२.०० वा. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती येथे आयोजित करण्यात येईल. ४. वरील काम क्रं. २ ते ३ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक १८/०६/२०२६ वेळ १२.०० वा. मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे आयोजित करण्यात येईल. ५. वरील काम क्रं. ०१ ते ०३ कामांची ई-निविदा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे उघडण्यात येतील. ६- खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in ७- ईतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत. ८. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही. तसेच निधी उपलब्ध झाल्यानुसार देयके अदा करण्यांत येतील. ९. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
**कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग अकोला**

सिटी न्यूज अकोला
बुधवार दि. १७ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## नगरसेवक सतीश जयस्वाल यांच्या पाठपुराव्याला यश

**तेल्हारा :** नगर परिषद क्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांना अंगणवाडी सेवांचा लाभ मिळावा यासाठी नगरसेवक सतीश जयस्वाल यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. यामुळे आता नगर परिषद क्षेत्रातील सर्व पात्र लाभार्थ्यांना अंगणवाडीमार्फत दिल्या जाणाऱ्या विविध योजनांचा व सेवांचा लाभ घेता येणार आहे. यापूर्वी नगर परिषद क्षेत्रातील अनेक नागरिकांना अंगणवाडी सेवांपासून वंचित राहावे लागत होते. या समस्येची दखल घेत नगरसेवक सतीश जयस्वाल यांनी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करून लाभार्थ्यांच्या अडचणी मांडल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे आता नगर परिषद क्षेत्रातील गर्भवती माता, स्तनदा माता, ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके तसेच किशोरी मुलींना अंगणवाडी सेवांचा लाभ उपलब्ध होणार आहे.

# अतिक्रमण कारवाईत दुजाभावाचा आरोप

## रस्ते, चौक आणि नाल्यांवरील अतिक्रमण हटवण्याची मागणी

वि.प्रतिनिधी १७ जून

**अकोट :** शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेचे नागरिकांकडून स्वागत होत असले तरी अनेक भागांमध्ये अद्यापही अतिक्रमणे कायम असल्याने प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. काही ठिकाणी अतिक्रमणे हटविली जात असताना इतर ठिकाणी मात्र ती जशीच्या तशी राहिल्याने कारवाईत दुजाभाव होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी हातगाड्या, फळ विक्रेते तसेच विविध प्रकारची अतिक्रमणे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अनेकदा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. विशेष म्हणजे वाहतूक विस्कळीत झाल्यानंतरही काही फळ विक्रेते व हातगाडीधारक आपली गाडी बाजूला करण्यास तयार नसल्याचे चित्र वारंवार पाहायला मिळत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या मते, अतिक्रमण हटाव मोहीम केवळ दिखाऊ किंवा औपचारिक न राहता शहरातील सर्व भागांत समान निकषांवर आणि सातत्याने राबविणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी रहदारीची मोठी समस्या निर्माण होत आहे, तेथे विशेष मोहीम राबवून अतिक्रमणे हटविण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, पावसाळा तोंडावर आला असताना नाल्यांवरील अतिक्रमणांचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अनेक ठिकाणी नाल्यांवर अतिक्रमणे झाल्याने नालेसफाईच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी पावसाचे पाणी साचण्याचा आणि शहरातील काही भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी नालेसफाईस अडथळा ठरणारी अतिक्रमणे आहेत, ती तातडीने हटवून मान्सूनपूर्व नालेसफाईचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. शहराच्या सुयोग्य वाहतुकीसाठी, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि पावसाळ्यातील संभाव्य संकट टाळण्यासाठी प्रशासनाने कोणताही भेदभाव न करता सर्व अतिक्रमणांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## सिंधी कँप भागात अतिक्रमण हटाव मोहिम

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने बुधवारी आपला मोर्चा सिंधी कँप भागात वळवला. रस्त्यावर लावलेल्या पान टप-या तसेच अस्थायी दुकाने हटवली. सकाळ पासूनच पथक या परिसरात सक्रिय झाले होते.



सिंधी कँप परिसर गजबजलेला आहे. तसेच हा मार्ग अतिशय वर्दळीचा आहे. त्यामुळे रस्ता मोकळा राहणे आवश्यक आहे. शहरात सध्या अतिक्रमण हटाव मोहीम दररोज राबविण्यात येत आहे. काही भागात नागरिक स्वतःहून अतिक्रमण काढत आहेत तर काही ठिकाणी क्षुल्लक वाद देखील होत आहेत. जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण काढले जात आहे. शहर सौंदर्यीकरण तसेच वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने मुख्य रस्ते अतिक्रमण मुक्त असणे आवश्यक आहे. त्यामुळे या मोहिमेला देखील महत्त्व आहे.

## मोहम्मद अली रोड - तेलीपुरा रोडवरील अतिक्रमण साफ

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** अकोला शहरातील मोहम्मद अली रोड आणि तेलीपुरा रोड परिसरात महानगरपालिकेने मोठी अतिक्रमण हटाव कारवाई केली आहे. महानगरपालिकेच्या पथकाने पोलिस बंदोबस्तात कारवाई करत रस्त्यांवरील अतिक्रमण हटवले. या कारवाईमुळे परिसरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



अकोला शहरातील गजबजलेल्या मोहम्मद अली रोड आणि तेलीपुरा रोड परिसरात महानगरपालिकेने अतिक्रमणा विरोधात धडक कारवाई केली. अनेक दिवसांपासून रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, शेड, साहित्य तसेच इतर अडथळ्यांमुळे वाहतुकीची कोंडी होत होती. महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने पोलिसांच्या मदतीने विशेष मोहीम राबवत रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवली. कारवाईदरम्यान काही ठिकाणी अनधिकृतरित्या रस्त्यावर ठेवण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले तर काही अतिक्रमणे तात्काळ हटविण्यात आली. या कारवाईमुळे मोहम्मद अली रोड आणि तेलीपुरा रोडवरील रस्ते मोकळे झाले असून वाहनचालक, व्यापारी आणिनागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत निर्माण होणारी वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## नोटीस न देता महापालिकेकडून दुकानावर कारवाई

### न्यायालयीन वाद सुरू असतानाही दुकान पाडल्याचा आरोप

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** शहरातील गांधी चौक परिसरात ९ जून २०२६ रोजी महापालिकेकडून कारवाई करत बिपिन भैयालाल मिरज़ामले यांचे दुकान पूर्णपणे पाडण्यात आले. संबंधित कुटुंबाचा आरोप आहे की, या कारवाईपूर्वी त्यांना कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती.

संबंधित जागेबाबत दुकानधारकांकडे कर पावत्या, स्थायी समितीचा ठराव, नगररचनाकारांची टिप्पणी, वीजपुरवठ्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र तसेच टिनशेड उभारण्याची परवानगी यांसारखी कागदपत्रे उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे.

यापूर्वी २०१४ मध्येही याच दुकानावर कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात गेले असून आजही न्यायालयीन वाद प्रलंबित असल्याचा दावा संबंधितांनी केला आहे. दुकानधारकांच्या म्हणण्यानुसार, न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना आणि विविध शासकीय कागदपत्रे उपलब्ध असतानाही कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे त्यांचा अनेक वर्षांचा व्यवसाय उद्ध्वस्त झाला असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी महापालिकेची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, न्यायालयीन वाद सुरू असताना करण्यात आलेल्या या कारवाईबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

## सिंहस्थ गुरु दोषामुळे अकोल्यात नोव्हेंबरपासून शुभ कार्ये नाहीत, पुरोहित संघाचा निर्णय

### 23 जानेवारी 2027 पर्यंत विवाह, वास्तूपूजन वर्ज्य

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी देवगुरु बृहस्पतीचा सिंह राशीत प्रवेश होत असल्याने अकोला शहरात 'सिंहस्थ गुरु दोष' लागणार आहे. या दोषामुळे नोव्हेंबर २०२६ पासून २३ जानेवारी २०२७ पर्यंत विवाह, वास्तूपूजन, भूमीपूजन, नवीन कामांचा शुभारंभ, मुंडन, यज्ञोपवीत व व्रत उद्यापन यांसारखी सर्व शुभ कार्ये वर्ज्य राहणार असल्याचा निर्णय अकोला पुरोहित संघाने घेतला आहे.



श्री बालाजी मंदिरात पार पडलेल्या पुरोहित संघाच्या सभेत गोदावरी नदीचा नकाशा, मुहूर्त चिंतामणि, धर्म सिंधु, निर्णय सिंधु तसेच महाराष्ट्रीयन, सम्राट व निर्णय सागर पंचांगांचा आधार घेऊन हा निर्णय घेण्यात आला. सभेत सांगण्यात आले की, या कालावधीत नक्षत्र पंचपाद व गुरु नवमांशाचा विशेष दोष राहील. त्यामुळे २३ जानेवारी २०२७ नंतरच शुभ कार्ये करावीत. दरम्यान, २०२६-२७ मध्ये नाशिक येथे कुंभमेळा होणार आहे. सिंहस्थ गुरु दोषाचे नियम मलमास व गुरु-शुक्र अस्ताप्रमाणे पाळले जातात. मात्र वेगवेगळ्या गावांसाठी व राज्यांसाठी हे नियम बदलू शकतात, असेही पुरोहित संघाने स्पष्ट केले. आधुनिक ज्योतिषशास्त्राचे काही जाणकार सिंह राशीतील गुरु दोष मानत नाहीत, असेही सभेत नमूद करण्यात आले.

सभेला पं. रमेश अडीचवाल, रतन तिवारी, नरेंद्र पंचारिया, लाला तिवारी, राजूभाई जाडा, प्रमोद तिवारी, श्याम सुंदर अवस्थी, आलोक शर्मा, सुमित तिवारी, भैरव शर्मा, सुरेश सिवाल व पं. रवि कुमार शर्मा आदी पुरोहित उपस्थित होते.

## शासकीय आयटीआय अकोला प्रवेश अर्जाची अंतिम मुदत २१ जून

प्रतिनिधी १७जून

**अकोला :** स्थानिक रतनलाल प्लॉट स्थित सम्राट चंद्रगुप्त मौर्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे आयटीआय प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला असून प्रवेश अर्ज दाखल करण्याची अंतिम दिनांक ही २१ जून रोजी आहे. प्रवेश निश्चिती २२जून पर्यंत सुरू राहील.

अधिकाधिक संख्येने प्रवेश इच्छुक दहावी उत्तीर्ण उमेदवारांनी अर्ज दाखल करावे.आणि आयटीआय मध्ये येऊन ते निश्चित करावे. असे आवाहन संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी संतोष साळुंखे यांनी केलेले आहे. संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख अरविंद पोहरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रवेश




अर्ज दाखल करून तो संस्थेमध्ये येऊन निश्चित करावा आणि मग नंतर विविध अभियांत्रिकी तथा बिगर अभियांत्रिकी ट्रेड निवडून तशी ऑप्शन फॉर्म भरावी. याबद्दलची माहिती संस्थेमध्ये उपलब्ध आहे.

संस्थेचे प्रवेश प्रमुख विनोद पायघन यांनी दिलेल्या माहितीनुसार इच्छुक उमेदवारांचा दरवर्षी प्रमाणे उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद लाभत आहे.विविध अभियांत्रिकी तथा बिगर अभियांत्रिकी व्यवसायांच्या एकूण ८८८ जागा उपलब्ध आहेत. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अकोला येथे प्रवेश याकरिता अधिकाधिक प्रवेश इच्छुक दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याकरता विविध समित्या कार्यरत आहेत.



महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्त राजपूत समाजाच्या वतीने शहरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. महाराणा प्रतापसिंह यांना मानवंदना दिली. युवकांनी रॅली काढली होती. महाराणा प्रतापसिंह यांचा जयजयकार करण्यात आला. महाराणा प्रताप बागेतील त्यांच्या पुतळ्याजवळ बुधवारी सकाळी आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे यांनी महाराणा प्रतापसिंह यांना मानवंदना दिली. राजपूत समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री. आदिनाथ जैन श्वेतांबर मंदिर वर्धापनदिन उत्साहाने साजरा

प्रतिनिधी १७जून

**अकोला :** गांधी चौकातील श्री. आदिनाथ जैन श्वेतांबर मदिराने १२२ वे वर्ष पूर्ण करून १२३ व्या वर्षांत जेष्ठ शुक्ल २, १६/६/२०२६ रोजी पदार्पण केले. सकाळ पासून उत्सव प्रमाणे सर्व कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पडत आहे. जैन मान्यते नुसार १०० वर्ष पूर्ण झालेले मंदिर हे तीर्थ म्हणून गणल्या जाते. आणि याच कारणामुळे कार्यक्रम खुप उत्साहाने, आनंदाने आणि भक्तीमय रीत्या पार पाडली जातात.




सकाळी वर्धमान डुप्लेक्स, खोलेश्वर येथुन 'नवीन ध्वज' वाजत गाजत गांधी चौक येथील मंदिरात आला. तदनंतर पूजन करुन नविन ध्वज मंदिर शिखरावर शास्त्रोक्त मंत्राचार च्या घोषात चढवण्यात आला. याच्या नतर दिड तासांचे विधीवत पुजन करुन सकल श्री संघ यांचे स्वामी वात्सल्य (प्रसादी भोजन) करुन कार्यक्रम ची सांगता झाली.

या वेळी प्रथम तीर्थंकर श्री आदेश्वर भगवान च्या मुर्ती ची देखनी, विलोभनीय आणि सुंदर सजावट 'जिनराज आंगी ग्रुप' च्या सौ. प्रियंका जैन, सौ. अवनी विशाल शाह, सौ. प्रियंका बेदमुथा आणि नैत्री हरीया या श्राविका यांनी केली. या प्रसंगी अकोला सकल जैन संघ यांनी उत्साहाने पुर्ण कार्यक्रम मध्ये भाग घेतला.

## जखमी माकडाला पकडण्याचा प्रयत्न फसला

**हिवरखेड :** येथील विकास मैदान परिसरात १७, जूनच्या सकाळी एका माकडाला अचानक शॉक लागल्याने ते माकड वरून खाली पडले व त्या माकडाला बघण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली



इतर माकड सुद्धा त्याला नेण्यासाठी धावपड करीत होते, परंतु ते माकड भितीपोटी सैरावैरा पळत होते, या घटनेची माहिती स्थानिक पशु प्रेमी रवी गावंडे, अर्जुन खिरोडकार यांनी वनविभागाचे आर, एफ ओ राऊत, आंबेकर, शिंदे, कटीयांर यांना देण्यात आली, त्यांनी कर्मचारी सोमत रजाने, दीपक मेश्री, यांना माकडाला पकडण्यासाठी पाठविले यांच्यासह गावातील पशुवैद्यकी कर्मचारी राजेश वायकर, अन्सार खा, पवन म भड, अन्सारखा जबीखा, वनकर यांनी जखमी माकडाला उपचार करण्यासाठी पकडण्याचा बराच प्रयत्न केला , परंतु प्रयत्न फसला माकड पकडण्यास अपयश आले.

## आलेगाव परिक्षेत्रात कारवाई, वनतस्करांचे धाबे दणाणले

प्रतिनिधी १७ जून

**अकोला :** आलेगाव वनपरिक्षेत्रांतर्गत झरंडी नियतक्षेत्रतील राखीव वन क्षेत्रात नियमित गस्तीदरम्यान वनरक्षक यांना कुऱ्हाडीसह सागवान वृक्षांची चौकट घेऊन आरोपी दिसून आले. सदर आरोपीला वन विभागाने ताब्यात घेतले आहे.

आलेगाव वन परिक्षेत्रात झरंडी क्षेत्रात वन कर्मचारी गस्त करीत असतांना त्यांना वसाली येथील बबन हरिसिंग जाधव हा इसम सागवाणाची तस्करी करत असताना आढळून आला, या वेळी सदर आरोपीला वन विभागाने ताब्यात घेतले आहे. या दरम्यात पुढील तपासादरम्यान संबंधित व्यक्तीच्या राहत्या घराची तपासणी करण्यात आली असता त्याच्या घरातून अवैध सागवान वनमाल व सागवान चौकटी आढळून आले. सदर मालाबाबत कोणतीही वैध कागदपत्रे त्याच्या कडे न आढल्याने सदरचा वनमाल जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

या प्रकरणी भारतीय वन अधिनियमानुसार वनगुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. जप्त वनमालाचे मूल्यांकन करण्यात येत आहे.सदर कारवाई आलेगाव वन परिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांचा मार्गदर्शनात वनपाल श्री. एन. एम. नाकाडे व वन कर्मचाऱ्यांनी केली.वनसंपत्तीचे संरक्षण ही सामूहिक जबाबदारी असून वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोड, वनमाल वाहतूक किंवा साठवणूक याबाबतची माहिती नागरिकांनी वन विभागास कळवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# हिवरखेडची कृषी प्रक्रिया सहकारी संस्था अवसायनात

प्रतिनिधी १७जून

**हिवरखेड :** कृषी प्रक्रिया सहकारी संस्थेला वेळोवेळी सूचना व संधी देऊनही संस्थेने पंचवार्षिक निवडणूक घेणेबाबत कसूर केला.तसेच मा. सहाय्यक निबंधक यांनी वारंवार सूचित करूनही प्रारूप मतदार याद्या कार्यालयास सादर केल्या नाहीत तसेच कार्यालयाकडील उपविधी दुरुस्तीबाबतच्या सूचनेकडे दुर्लक्ष करून संस्थेने लेखा परीक्षण करून घेतले नाही. संस्थेने नियमानुसार कामकाज करणे बंद केले असून संस्थेचे संचालक व सभासद यांना सदरहू संस्था चालविन्यात स्वारस्य राहिले नसल्यामुळे संस्था अवसायनात काढण्यात आल्याचे



समजते.

एकेकाळी हिवरखेडचे माजी आमदार डॉ. का.शा. तिडके यांनी आजच्या काळात कोट्यावधी रुपये किंमत असलेले स्वमालकीचे शेत शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी व हितासाठी दिले होते व त्यांच्या काळात या संस्थेने नेत्रदीपक प्रगती केली होती. त्यानंतर श्री एकनाथजी तिडके यांनी सुद्धा या संस्थेला प्रगतीथावर नेले होते. नंतरच्या काळात मात्र हळूहळू वैयक्तिक स्वार्थ व वर्चस्व अबाधित ठेवण्याच्या इर्षेतून संस्था डबघाईला आली व आवसायनात गेली. पण हाय वे टच करोडो रुपयाची ही मालमत्ता डोळ्यासमोर ठेवून व पुढील आर्थिक लाभ लक्षात घेऊन काही अतिमहत्वाकांक्षी भागधारकांनी काही लोकांना हाताशी धरून ही संस्था पुनर्जीवीत केली. अर्थात या गोष्टीची कल्पना भागधारकांना नव्हती. सहकार क्षेत्र जणूकाही आपल्याच मुठीत आहे या अविर्भावात २९/९/२०२५ रोजी संस्था अवसायनात काढण्याबाबत मा. सहाय्यक निबंधक यांनी पाठवलेल्या अवसायनपूर्व नोटीसला निर्धारित तारखेच्या आत खुलासा सादर करण्याचे सूचित केले होते पण त्या आदेशाकडे सुद्धा संचालकांनी दुर्लक्ष करत खुलासा सादर केला नाही. या सर्व बाबी लक्षात घेता मा. सहाय्यक निबंधक तेल्हारा यांनी दि. ५/६/२०२६ रोजी कृषी प्रक्रिया संस्था हिवरखेड र. न. ११३ अवसायनात काढण्यात येत असल्याचे आदेश देत श्री. एम. के. विखे यांची अवसायक म्हणून नियुक्ती करण्याचा आदेश काढला असल्याचे समजते.

या संस्थेची भागधारकांना कुठलीही माहिती न देता गुपचूप निवडणूक लावून घेण्याचा प्रयत्न संस्थेचा एक भागधारक करत असल्याचे तसेच आपल्या जवळच्या मोजक्या मय्यत भागधारकांचे शेअर्स बदलवून त्यांच्या जागी त्यांच्या कुटुंबातील इतर व्यक्तीच्या नावे शेअर्स केले असल्याची व हे सर्व करत असतांना इतर मयत भागधारकांच्या वारसाना या गोष्टीची कुठलीही कल्पना न देता, आमसभा न घेता आपल्या वतीचे भागधारक वाढविले असल्याची हिवरखेड व परिसरात चर्चा आहे.

## हिवरखेड येथे विषबाधेने 55 शेळ्या दगावल्या

प्रतिनिधी १७ जून

**हिवरखेड :** येथील फाटकाची शेवडी शिव शेत शिवराजवळ बकऱ्या चारापाणी करत असताना ,अचानक विषबाधा झाल्याचे बकऱ्या चारणारे ढोरकी यांच्या लक्षात येताच त्यांनी आजुबाजूच्या शेतशिवारातील शेतकऱ्यांची मदत घेऊन पशु वैद्यकीय दवाखान्यात काही बकऱ्या उपचार घेण्यासाठी आणल्या. तर काही घटनास्थळी दगावल्या. एकूण ५५ बक-या दगावल्या.



पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अबोली कथे व कर्मचारी राजेश वायकर यांनी विषबाधा झालेल्या शेळ्या वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्यांना बजरंग तिडके, अन्सार खा, संतोष पटोळे, अर्जुन खिरोडकार, प्रणव इंगळे, संतोष मानकर, आबिद खा, दत्तू धुरदेव, राजेश राजनकार यांनी सहकार्य केले. तसेच मंडळ अधिकारी डी.आर.झापे, तलाठी समीर खान, मोहन कुलाळ यांनी पंचनामा केला. तर नगरपरिषद कडून मृत बकऱ्या पुरण्यासाठी जेसीबीची व्यवस्था करण्यात आली. भाजपचे रमेश दुतोंडे यांनी आमदार प्रकाश भारसाकळे यांच्याकडे मदतीची मागणी करुन नुकसान भरपाईचे प्रयत्न करू असे स्पष्ट केले. घटनास्थळी ठाणेदार सचिन पाटील व पोलिस कर्मचारी यांनी भेट दिली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १७ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## टाकळी पुलाजवळील जीवघेणा खड्डा; तातडीने दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी १७ जून

**पाटणबोरी :** येथून पाटणकडे जाणाऱ्या मार्गावरील टाकळी पुलाजवळ मोठा जीवघेणा खड्डा पडल्याने वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या खड्ड्यात अनेक चारचाकी वाहने अडकली असून दुचाकी व ऑटोचेही अपघात झाले आहेत. याबाबत वारंवार बातम्या प्रसिद्ध होऊनही संबंधित विभागाकडून केवळ तात्पुरती दुरुस्ती करण्यात आल्याने खड्डा पुन्हा पूर्ववत झाला आहे. रात्रीच्या वेळी वाहनचालकांना टायर पंचर होणे, वाहने अडकणे अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वणी, चंद्रपूर आणि आदिलाबादला जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावर रेती वाहतूक करणारी तसेच मुकुटबन परिसरातील जड ओव्हरलोड वाहने मोठ्या प्रमाणात धावतात.

त्यामुळे खड्ड्याचा आकार वाढत आहे. पावसाळ्यात मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# जिल्ह्याला मिळणार 89 नवे केंद्रप्रमुख; पीएच.डी., नेट-सेटधारक शिक्षकांची नियुक्ती होणार

प्रतिनिधी १७ जून

### शिक्षण गुणवत्तेला मिळणार चालना; समुपदेशनानंतर लवकरच आदेश

**यवतमाळ :** जिल्हा परिषद शाळांमधील अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या केंद्रप्रमुख पदांची भरती अखेर अंतिम टप्प्यात पोहोचली असून जिल्ह्याला लवकरच ८९ नवे केंद्रप्रमुख मिळणार आहेत. नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच ही प्रक्रिया पूर्ण होत असल्याने शाळांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजाला बळ मिळणार आहे.

राज्य शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या 'समूह साधन केंद्र समन्वयक तथा केंद्रप्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५' मध्ये जिल्ह्यातील सुमारे अडीच हजार शिक्षक सहभागी झाले होते. ३ व ४ फेब्रुवारी रोजी सहा सत्रांत ऑनलाइन पद्धतीने झालेल्या परीक्षेचा निकाल १३ मार्च रोजी जाहीर करण्यात आला होता.

जिल्ह्यातील ८९ रिक्त पदांसाठी अडीचपट प्रमाणात सुमारे ३०० पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी बुधवारी वसंतराव नाईक जिल्हा परिषद सभागृहात पार पडली. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या सूचनेनुसार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी धोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा यांच्या नियंत्रणात सहा स्वतंत्र चमूंमार्फत ही प्रक्रिया राबविण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गातील ८५ आणि दिव्यांग प्रवर्गातील ४ अशा एकूण ८९ पदांसाठी उमेदवारांना पडताळणीसाठी बोलाविण्यात आले होते. बहुतांश उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केली असून अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. आता समुपदेशन प्रक्रियेनंतर नियुक्ती आदेश जारी होण्याची शक्यता आहे. केंद्रप्रमुख हे शाळा आणि शिक्षण प्रशासन यांमधील महत्त्वाचा दुवा मानले जातात. शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, शिक्षकांना मार्गदर्शन, शाळांची देखरेख, विविध शैक्षणिक उपक्रमांची अंमलबजावणी आणि नियोजन या जबाबदाऱ्या केंद्रप्रमुखांवर असतात. त्यामुळे दीर्घकाळ रिक्त राहिलेली पदे भरली जात असल्याने शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

#### गुणवंत शिक्षकांची केंद्रप्रमुखपदी निवड

■ या भरती प्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे उच्च शैक्षणिक पात्रता असलेल्या शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर निवड झाली आहे. नव्या केंद्रप्रमुखांमध्ये ३ पीएच.डी. धारक, ७ नेट उत्तीर्ण, ११ सेट उत्तीर्ण, २ पीएच.डी. संशोधन फेलो तसेच १ राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते शिक्षक यांचा समावेश आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या शिक्षण व्यवस्थेला संशोधनवृत्तीचे, अनुभवी आणि नेतृत्वक्षम अधिकारी मिळणार आहेत. दरम्यान, केंद्रप्रमुख पदोन्नतीमुळे रिक्त होणाऱ्या शिक्षकांच्या जागांचा समावेश पवित्र पोर्टलवर करण्यात येणार असल्याने पात्र बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच अनेक वर्षांपासून अतिरिक्त जबाबदारी सांभाळणाऱ्या प्रभारी केंद्रप्रमुखांनाही या प्रक्रियेमुळे दिलासा मिळणार आहे.



# एफडीएची धाड; प्रतिबंधित गुटखा जप्त, आरोपी फरार

प्रतिनिधी १७ जून

**महागाव :** अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने महागाव शहरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये छापा टाकून प्रतिबंधित गुटख्याचा साठा जप्त केला. या कारवाईत २६ हजार ६९४ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून संबंधित आरोपी घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाग क्रमांक १७ येथील शेख सद्दाम यांच्या निवासस्थानी बुधवारी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास एफडीए व पोलिसांच्या पथकाने धाड टाकली. मात्र, कारवाईची चाहूल लागताच शेख सद्दाम यांनी तेथून पळ काढल्याचे सांगण्यात येत आहे.

छाप्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पथकाने तो जप्त करून पंचनामा केला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या कारवाईनंतर महागाव शहरात एकच खळबळ उडाली. कारवाईच्या पार्श्वभूमीवर अनेक हॉटेल्स, किराणा दुकाने तसेच पानटपऱ्यांनी दिवसभर दुकाने बंद ठेवली. त्यामुळे शहरात विविध चर्चांना उधाण आले होते.

एफडीएचे अधिकारी अमितकुमार उपलाप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पोलिसांच्या सहकार्याने करण्यात आली.

फरार आरोपीचा शोध सुरू असून या धाडीमुळे गुटखा विक्रेते आणि तस्करांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.

## महागाव नगरपंचायतीत 'टक्केवारीचे राजकारण'; काँग्रेसचे शैलेश कोपरकर यांचा गंभीर आरोप

प्रतिनिधी १७ जून

**महागाव :** महागाव नगरपंचायतीतील सत्ताधारी पदाधिकारी आणि नगराध्यक्षांच्या पतीच्या कथित हस्तक्षेपामुळे शहरातील विकासकामे ठप्प झाली असून नगरपंचायतीचा कारभार जनहितापेक्षा 'टक्केवारीच्या राजकारणा'भोवती फिरत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शैलेश कोपरकर यांनी केला आहे.

शहरातील रखडलेली विकासकामे, प्रलंबित प्रश्न आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नगरपंचायतीत विकासकामांपेक्षा टक्केवारीला अधिक महत्त्व दिले जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असल्याचा दावा त्यांनी केला.



कोपरकर यांच्या म्हणण्यानुसार, रस्ते, नाल्या, पिण्याच्या पाण्याच्या योजना, स्वच्छता तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित अनेक कामांना मंजुरी मिळूनही त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. काही कामे मंजूर असूनही ती जाणीवपूर्वक रखडवली जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. नगरपंचायतीचा कारभार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धर्तीवर चालविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी नगराध्यक्षांच्या पती तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दीपक आडे यांचे नाव घेत प्रशासकीय कामकाजात त्यांच्या कथित हस्तक्षेपावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील मर्यादा पाळल्या गेल्या पाहिजेत; मात्र काही व्यक्ती निर्णय प्रक्रियेत अनावश्यक हस्तक्षेप करत असल्याने प्रशासनावर दबाव निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

महागाव कृषी उत्पन्न बाजार समितीची आर्थिक आणि प्रशासकीय स्थिती आधीच अत्यंत बिकट असून ती 'व्हेंटिलेटर'वर असल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत त्या कारभाराची पुनरावृत्ती नगरपंचायतीत होऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांची असल्याचे कोपरकर यांनी सांगितले.

तसेच नगरपंचायत कार्यालयात विविध दाखले, प्रमाणपत्रे आणि प्रशासकीय कामांसाठी नागरिकांकडून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असल्याचा आरोपही त्यांनी केला. नागरिकांना वेळेत सेवा मिळण्याऐवजी आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे ते म्हणाले.

या कथित गैरप्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. शहराच्या विकासासाठी आलेला निधी पारदर्शकपणे खर्च व्हावा, विकासकामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण व्हावीत आणि नागरिकांच्या कराच्या पैशांचा योग्य वापर व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. आपण केलेल्या आरोपांबाबत आवश्यकतेनुसार संबंधित यंत्रणांसमोर पुरावे सादर करण्यास तयार असल्याचेही कोपरकर यांनी स्पष्ट केले. नगरपंचायतीतील कथित गैरप्रकार, हस्तक्षेप आणि टक्केवारीच्या राजकारणाची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, या आरोपांमुळे महागावच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून संबंधितांकडून यावर काय भूमिका घेतली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## आर्णीत मोफत नेत्रतपासणी शिबिर

प्रतिनिधी १७ जून

**आर्णी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आर्णी येथे मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आर्णी, महात्मे हॉस्पिटल, नागपूर आणि अंजली डायग्नोस्टिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.

"८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण" या भूमिकेतून महाराष्ट्र नवनिर्माण सेना दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवित असते. त्याचाच एक भाग म्हणून यंदा हे नेत्र आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती मनसेचे उपजिल्हाध्यक्ष सचिन येलगंधेवार आणि शहराध्यक्ष कपिल ठाकरे यांनी दिली. हे शिबिर १९ जून रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेदरम्यान अंजली कॉर्नर, जाधव पेट्रोल पंप परिसर, आर्णी येथे होणार आहे.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नेत्रतपासणी करण्यात येणार असून मोतीबिंदूग्रस्त रुग्णांची मोफत शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात येईल. तसेच गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वितरणही करण्यात येणार आहे.

शहर व तालुक्यातील नागरिकांनी या मोफत आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सामाजिक बांधिलकी जपत उभी केली रोजगारनिर्मितीची चळवळ : संजय गावंडे

प्रतिनिधी १७ जून

**आर्णी :** व्यवसायातील यशासोबतच समाजाप्रती असलेली बांधिलकी जपणारे आर्णीतील सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक संजय गावंडे यांनी रोजगारनिर्मिती, शेतकरी कल्याण आणि समाजसेवेच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेले पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेळी-मेंढी संगोपन केंद्र ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगाराचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे.



या केंद्रामुळे अनेक बेरोजगार युवक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. ग्रामीण युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देण्याचे कार्यही केंद्रामार्फत सातत्याने केले जात आहे.

शेळी-मेंढी पालनातून तयार होणारे सेंद्रिय खत परिसरातील शेतकऱ्यांना मोफत देण्याचा उपक्रम गावंडे यांनी हाती घेतला आहे. रासायनिक खतांच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होत आहे. सेंद्रिय शेतीला चालना मिळावी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, या उद्देशातून हा उपक्रम राबविला जात आहे.

शेतकऱ्यांच्या विविध अडचणी समजून घेत त्यांना शक्य ती मदत करण्यासाठी गावंडे नेहमीच पुढाकार घेतात. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदराची भावना निर्माण झाली आहे. सामाजिक कार्याच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. गरजू, गरीब आणि संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी ते सातत्याने कार्यरत असतात. समाजातील दुर्बल घटकांना आधार देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे त्यांची ओळख केवळ यशस्वी व्यापारी म्हणून नव्हे, तर संवेदनशील समाजसेवक म्हणूनही निर्माण झाली आहे.

स्पर्धा आणि स्वार्थाला प्राधान्य मिळत असलेल्या काळात रोजगारनिर्मिती, शेतकरी हित आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधणारे संजय गावंडे यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या उपक्रमांमुळे आर्णी तालुक्याच्या सामाजिक व आर्थिक विकासाला नवी दिशा मिळत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## तहसीलमधील सुविधा केंद्राची अचानक तपासणी

प्रतिनिधी १७ जून

**आर्णी :** तहसील कार्यालयातील सेतू सुविधा केंद्रामार्फत शासनाने निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी गंगाधर होवाळे यांनी सोमवारी अचानक भेट देत केंद्राची सखोल तपासणी केली. या तपासणीमुळे तहसील कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली.

उपविभागीय अधिकाऱ्यांनी सेतू केंद्रातील विविध दाखल्यांच्या शुल्काबाबतची कागदपत्रे, पावत्या, नोंदवही व इतर अभिलेखांची बारकाईने पडताळणी केली. यावेळी केंद्रावर उपस्थित असलेल्या नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्याकडून आकारण्यात आलेल्या शुल्काची माहिती जाणून घेतली. काही नागरिकांनी सेवा मिळविताना येणाऱ्या अडचणींबाबतही अधिकाऱ्यांना माहिती दिली. शासनाने विविध दाखल्यांसाठी निश्चित शुल्क ठरवून दिले असून त्यापेक्षा अधिक रक्कम आकारल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. नागरिकांना पारदर्शक व वेळेत सेवा मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. तपासणीदरम्यान सेतू केंद्रातील कामकाज, अर्ज निकाली काढण्याचा कालावधी, शुल्क आकारणीची प्रक्रिया तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांचीही पाहणी करण्यात आली. प्रशासनाच्या या अचानक कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून अशा तपासण्या नियमितपणे व्हाव्यात, अशी मागणी केली आहे.

# माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन भोवले; सेवानिवृत्त विस्तार अधिकाऱ्यास २५ हजारांचा दंड

प्रतिनिधी १७ जून

### अमरावती माहिती आयुक्तांचा आदेश; उमरखेड पंचायत समितीतील प्रकरण

**उमरखेड :** माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत मागविलेली माहिती वेळेत न देता कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी उमरखेड पंचायत समितीचे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी के. पी. सोनटक्के यांना सेवानिवृत्तीनंतर २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. हा आदेश अमरावती विभागाचे माहिती आयुक्त यांनी दिला आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते तथा पत्रकार दिगांबर मनवर यांनी माहितीचा अधिकार कायद्यानुसार पंचायत समितीअंतर्गत विविध बाबींची माहिती मागितली होती. मात्र, विहित मुदतीत माहिती न देता जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. यानंतर मनवर यांनी माहिती आयुक्तांकडे दाद मागितली.

या प्रकरणाची सुनावणी माहिती आयुक्त, अमरावती यांच्या न्यायालयात झाली. सुनावणीनंतर तत्कालीन जनमाहिती अधिकारी के. पी. सोनटक्के यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश देण्यात आले. ही रक्कम दरमहा ५ हजार रुपये कपात करून माहिती आयुक्त कार्यालयाच्या लेखाशीर्षाखाली जमा करण्याचे तसेच त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंजाब रणमले यांना अर्जदारास एका आठवड्याच्या आत माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. माहिती न दिल्यास प्रतिदिन २५० रुपये किंवा कमाल २५ हजार रुपयांपर्यंत दंड का आकारण्यात येऊ नये, याबाबत पुढील सुनावणीदरम्यान लेखी खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी किरण कोळपे यांनी आयोगाच्या आदेशानुसार अर्जदारास माहिती मिळाली की नाही, याचा आढावा घेतला नसल्याचे निरीक्षण नोंदवत त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी का करण्यात येऊ नये, याबाबतही पुढील सुनावणीत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे माहिती अधिकार कायद्याचे पालन न करणाऱ्या शासकीय कार्यालयांमध्ये खळबळ उडाली असून माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासनाला स्पष्ट संदेश मिळाल्याची चर्चा आहे.

#### माहितीसाठी पाच वर्षांचा संघर्ष

■ पत्रकार तथा माहिती अधिकार कार्यकर्ते दिगांबर मनवर यांनी सन २०२० मध्ये पंचायत समिती उमरखेड येथे माहिती मिळविण्यासाठी नियमानुसार अर्ज दाखल केला होता. मात्र, तत्कालीन व विद्यमान जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी माहिती देण्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला. अखेर त्यांनी माहिती आयुक्तांकडे धाव घेतली. तब्बल पाच वर्षांच्या पाठपुराव्यानंतर या प्रकरणात आदेश प्राप्त झाल्याने त्यांच्या संघर्षाला यश मिळाले आहे.

## उमरखेडला ५७.२५ कोटींची नवी न्यायालयीन इमारत; ११ कोर्ट हॉल्सची सुविधा

प्रतिनिधी १७ जून

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील न्यायव्यवस्था अधिक सक्षम आणि सुलभ करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेत महाराष्ट्र शासनाने नवीन न्यायालयीन इमारतीसाठी ५७ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. तळमजला अधिक दोन मजले अशा स्वरूपाच्या या इमारतीत ११ अत्याधुनिक कोर्ट हॉल्स उभारण्यात येणार आहेत.

उच्च न्यायालय, मुंबई यांनी उमरखेड येथे अतिरिक्त न्यायालयीन इमारत उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. त्यानुसार शासनाने या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली २१ मे २०२६ रोजी झालेल्या उच्चाधिकार सचिव समितीच्या बैठकीत या प्रकल्पास हिरवा कंदील देण्यात आला.

नवीन न्यायालयीन इमारत पूर्ण झाल्यानंतर उमरखेड तालुक्यासह परिसरातील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. विशेषतः तालुक्याच्या दुर्गम भागातील नागरिक, पक्षकार आणि वकील बांधवांना याचा मोठा लाभ होणार आहे. न्यायप्रक्रिया अधिक गतिमान, सोयीस्कर आणि प्रभावी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे. गेल्या काही वर्षांत उमरखेड शहरात पोलिस ठाणे, पोलिस वसाहत, पोस्ट कार्यालय, प्रशासकीय इमारत, उपजिल्हा रुग्णालय, विश्रामगृह, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, बसस्थानक सुशोभीकरण, पशुवैद्यकीय दवाखाना आणि जगदंबा देवी टेकडी सुशोभीकरण यांसारखे विविध विकास प्रकल्प राबविण्यात आले आहेत. त्यात आता न्यायालयीन इमारतीची भर पडली आहे. भाजपचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगितले. अत्याधुनिक न्यायालयीन इमारतीमुळे पक्षकार आणि वकील बांधवांना मोठी सुविधा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. माजी आमदार नामदेवराव ससाने यांनीही या प्रकल्पासाठी शासन स्तरावर पाठपुरावा केल्याचा दावा केला आहे.

न्यायालयीन इमारतीसाठी जागा उपलब्ध करून देणे, जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया मार्गी लावणे तसेच दिवाणी न्यायालय स्तर-१ मंजूर करून आणण्यासाठी प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. या नव्या न्यायालयीन इमारतीमुळे उमरखेडच्या विकासाला नवी चालना मिळणार असून न्यायव्यवस्थेच्या पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय द्वारा ॲड राजेश शहा बिल्डींग (लाला बिल्डींग समोर ) अवधूतवाडी यवतमाळ ता. जि. यवतमाळ येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A3072, RRC Helpline No. 8484842135